श्रीम. रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी तालुका संगमनेर यांना गैरवर्तनाबाबत ग्रामपंचायत अधिकारी पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/क्र. ९६६६६६३
दिनांक - १६ / ०८ /२०२५

संदर्भ- १. गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचे पत्र क्रमांक आस्था-२/२५६२/ दिनांक ११/०६/२०२५ समवेत दोषारोपपत्र ०१ ते ०४
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१)(अ)

ज्या अर्थी श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी तालुका संगमनेर येथे कार्यरत असुन त्यांनी त्यांचे कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केलेला आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे बधंनकारक आहे. श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी यांनी ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून ग्रामपंचायत अभिलेखे लेखापरिक्षणाला सादर न करणे, ग्रामपंचायतीचे अभिलेखे तपासणी कामी उपलबध करुन न देणे ,ग्रामनिधीचा रक्कम रुपये १०२३४३/-मात्र चा अपहार करणे. गैरहजर राहणे, अशा प्रकारचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन करुन तसेच कर्तव्याचे पालन न करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकरण, जिल्हा परिषद अहिल्यानगर, या आदेशाव्दारे श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी तालुका संगमनेर यांचे विरुध्द शिस्तविषयक कार्यवाही सुरु व अनिर्णित असल्याने यांना सदरचा आदेश बजावलेच्या दिनांका पासून जिल्हा परिषद सेवेतुन ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवा निलबीत करीत आहे.

श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी,यांचा सेवानिलंबन आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीतील त्यांचे सेवानिलंबन कालावधातील मुख्यालय पंचायत समिती श्रीरामपूर ------ येथे राहिल. त्यांना सेवानिलंबन कालावधीत देण्यात आलेल्या पंचायत समिती मुख्यालयाचे गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत.

निलंबनाच्या कालावधीत श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ग्रामपंचायत अधिकारी यांनी खाजगी नोकरी अथवा कोणताही व्यवसाय स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास त्या बाबतचे पुरवणी दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते पुढील सेवानिलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

सेवानिलंबनाचे कालावधीत श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल. त्या त्या वेळी त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी स्विकारली नाही ,अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र सेवा निलंबीत कालावधीत त्यांना दिलेल्या मुख्यालयाचे गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करावे.

श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी, ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवा निलंबन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमाप्रमाणे अदा करण्याची कार्यवाही या आदेशान्वये सेवा निलबीत केलेनंतर दिलेल्या मुख्यालय तालुक्याचे गट विकास अधिकारी पंचायत समिती हे करतील.

या आदेशाची नोंद श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०९१६०६०९२० असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:39:17
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जाखुरी तालुका संगमनेर
व्दारा :- गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर
२/-सदर सेवा निलंबन आदेश श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व त्याची पोहच विना विलंब सादर करावी.

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती --श्रीरामपूर---- जिल्हा अहिल्यानगर.
२/- श्रीम.रेशमा भाऊसाहेब गोसावी सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी आपले मुख्यालयी हजर झालेचा अहवाल सादर करावा.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर